जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४७१ दिनांक - २७/०६/२०२३**

मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर

## हद्दीतील सराईत गुन्हेगार व गंभीर गुन्हयातील मुख्य पाहीजे आरोपीस केले अटक

दिनांक २३/१०/२०२२ रोजी मुंढवा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर २८२/२०२२ भादंवि कलम ३८४, ३८७, ३४१, ४५२, ५०६, ३२३, १४३, १२० (ब) प्रमाणे दाखल गुन्हयातील मुख्य आरोपी **योगेश प्रकाश नागपुरे, वय ३५ वर्षे, रा. सर्व्हे नं. ४०,जांभळे प्लॉट, जनसेवा बँकचे पाठीमागे, केशवनगर,मुंढवा,पुणे** हा गुन्हा दाखल झाल्यापासून गेली ८ महिन्यापासून पोलीसांना चकवा देत राज्य, परराज्यात फिरत होता.

मुंढवा पोलीस ठाणे कडील पोलीस अंमलदार दिनेश भांदुर्गे यांना त्यांचे खास बातमीदारांमार्फेत माहिती मिळाली की,आरोपी योगेश नागपुरे हा ए.बी.सी.चौक,मुंढवा पुणे येथे येणार असल्याची माहिती मिळालेवरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विष्णू ताम्हाणे यांचे सुचनांप्रमाणे सदर ठिकाणी सहा.पोलीस निरीक्षक, समीर करपे व तपास पथकातील अंमलदार यांनी सापळा लावून सराईत गुन्हेगार व गंभीर गुन्हयातील मुख्य पाहीजे आरोपी योगेश प्रकाश नागपुरे यास ताब्यात घेण्यात आले आहे.

मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-५ पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख,यांच्या आदेशान्वये व मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे शहर श्रीमती अश्विनी राख यांच्या मार्गदर्शनाखाली,मुंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विष्णू ताम्हाणे,पोलीस निरीक्षक श्री.प्रदिप काकडे यांचे सुचानाप्रमाणे सहा.पोलीस निरीक्षक,समीर करपे,पोलीस अंमलदार दिनेश भांदुर्गे, महेश पाठक, सचिन पाटील यांचे करवी यशस्वी सापळा कारवाई केलेली आहे.